


सायं दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५८ वा | शनिवार दि. १९ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मोफत UPIला शुल्काचा डल्ला; 'डिजिटल इंडिया'ला रोखीच्या वाटेवर ढकलणार?

## व्यापाऱ्यांवर शुल्क, फटका ग्राहकांना? डिजिटल क्रांती की शुल्कक्रांती?

मुंबई (कटूसत्य वृत्त):- जगभरात गाजावाजा केलेल्या 'युनिफाइड पेमेंट इंटरफेस'द्वारे (यूपीआय) होणाऱ्या व्यवहारांवर शुल्काचा निर्णय कोट्यवधी नागरिकांच्या खिशाला नि:संशय खार लावणारा आहे. दोन हजार रुपयांहून मोठ्या 'व्यक्ती ते व्यापारी' व्यवहारांवर ०.४ टक्के दराने 'मर्चंट डिस्काउंट रेट' (एमडीआर) आकारण्याच्या निर्णयावरून देशात वादांचे मोहोळ उभे राहिले आहे. विरोधकांनी विशिष्ट 'लॉबी'च्या दबावाखाली हे शुल्क लागू झाल्याचा आरोप केला आहे.

सरकारचे समर्थक मानल्या जाणाऱ्या वर्गातूनही या शुल्कवसुलीबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या शुल्काबाबत वेगवेगळ्या मार्गांनी स्पष्टीकरण देण्यात येत असले, तरी आजवर या विषयाबाबत सरकारने मारलेल्या कोलांटउड्या पाहता, त्यावर विश्वास ठेवण्यास सध्या तरी कोणी तयार नसल्याचे दिसते. सुलभ 'यूपीआय' व्यवहारांपासून नागरिकांना परावृत्त करून पुन्हा रोखीच्या व्यवहारांकडे ढकलणारा व डिजिटल अर्थव्यवस्थेच्या मार्गात खोडा घालणारा हा निर्णय दुर्दैवीच म्हणावा लागेल.

गेल्या दशकात नोटाबंदीमुळे रोखीच्या व्यवहारांवर मर्यादा येऊन ऑनलाइन व्यवहारांना चालना मिळाली. आजमितीला या व्यवहारांचे प्रमाण जवळपास २५ अब्जांवर पोहोचले आहे. मात्र, या यशोगाथेत सर्वांत मोठा वाटा असलेल्या 'शून्य एमडीआर'ला धक्का देणारा निर्णय नुकताच सरकारने घेतला.

७५ हजार रुपयांहून अधिक रकमेच्या व्यवहारांवर तीनशे रुपये आणि रेल्वे, दूरसंचार, विमा, इंधन अशा ठरावीक क्षेत्रांतील दोन हजार रुपयांपेक्षा मोठ्या व्यवहारांवर




प्रत्येकी पाच रुपये शुल्क आकारले जाईल. 'यूपीआय'द्वारे दरमहा एक लाख रुपयांहून कमी रक्कम स्वीकारणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांना त्यातून सूट देण्यात आली आहे. ही व्यवस्था चालवण्यासाठी सुमारे वीस हजार कोटी रुपये खर्च येतो. सरकार त्यापैकी काही वाटा उचलत असले, तरी बँका आणि सेवा पुरवठादारांना त्याचा भार सोसावा लागतो; त्यामुळेच ही प्रणाली स्वावलंबी बनवणे, सर्व्हर व एकूण यंत्रणेची देखभाल आणि सायबर सुरक्षेच्या खर्चांसाठी हे शुल्क लागू केल्याचे सरकार सांगते. सरकारी निवेदनांपुरते पाहिले, तर यावर आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र, तपशिलात डोकावल्यास यामागील अनेक विरोधाभास समोर येतात.

'हे शुल्क व्यापाऱ्यांकडून वसूल होणार असून, सर्वसामान्यांवर त्याचा भार पडणार नाही,' हे यातील धडधडीत असत्य! कोणताही व्यापारी-व्यावसायिक कोणताही कर स्वत:च्या नफ्यातून भरत नाही; तर ग्राहकांच्या खिशांतून वसूल करून सरकारदरबारी केवळ जमा करतो, हे बाळबोध वास्तव नागरिकांना समजत नाही, अशी कोणाची समजूत असेल, तर तो त्यांचा भ्रमच. रेल्वे-विमानांची तिकिटे, मोठ्या व्यापाऱ्यांकडून खरेदी, मॉल, सोने-चांदी, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, हॉटेल किंवा रुग्णालयांची बिले असे सर्व व्यवहार या शुल्काच्या कक्षेत येतील. त्यामुळे या वस्तू व सेवांची दरवाढ होईल.

परिणामी सणासुदींच्या दिवसांत या खरेदीवरही परिणाम होऊ शकतो. त्याबरोबरच शुल्क वाचवण्यासाठी व्यापारी आणि ग्राहकही पुन्हा रोखींच्या व्यवहारांकडे वळल्यास नवल नाही. त्यातून अर्थव्यवस्थेत पुन्हा काळ्या पैशांचा चंचुप्रवेश अटळ आहे.

अमेरिकी 'लॉबी'च्या दबावामुळे हे शुल्क लागू केल्याचा आरोप सरकार फेटाळत असले, तरी 'शून्य एमडीआर'मुळे भारतात स्पर्धात्मक मैदान मिळत नाही,' असे आक्षेप अमेरिकेचे सरकार आणि कार्ड कंपन्यांनी अनेकदा नोंदवले होते, ही वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही.

या शुल्कातून बँका, देशी-विदेशी 'यूपीआय' सेवा पुरवठादार आणि 'फिनटेक' कंपन्यांना सर्वाधिक लाभ होणार, हेसुद्धा वास्तव आहे. रिझर्व्ह बँकेने सरकारला गेल्या वर्षी पावणेतीन लाख कोटी रुपयांचा लाभांश दिला होता; त्या तुलनेत 'यूपीआय'चा २० हजार कोटी रुपयांचा खर्च नगण्यच म्हणावा लागेल.

एकीकडे कर्जे बुडविणाऱ्या बड्या उद्योगपतींना हजारो कोटी रुपयांचे 'हेअरकट' मिळतात आणि प्रामाणिक व्यवहार करणाऱ्यांना शुल्काचा बडगा उगारला जातो, असे युक्तिवाद टोकाचे-गैरलागू वाटले, तरी ती 'जनभावना' हे विसरून चालणार नाही. त्यामुळेच 'जगात काही फुकट मिळत नाही,'सारखी उद्दाम-भांडवलशाही भाषा सोडून 'यूपीआय'चा डोलारा सांभाळण्यासाठी सरकारी वाटा आणि कंपन्यांवर काही भार टाकणारे शाश्वत मॉडेल उभे करावे, हाच त्यावरील उपाय आहे.

UPI ची ताकद ही त्याच्या वेगातच नाही; 'व्यवहार करणे सोपे आणि शुल्कमुक्त' या विश्वासातही आहे. हा विश्वास डळमळीत झाला, तर त्याची किंमत केवळ व्यापाऱ्यांना किंवा बँकांना नव्हे, तर संपूर्ण डिजिटल अर्थव्यवस्थेला मोजावी लागू शकते.

डिजिटल भारत उभारायचा असेल तर डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणारे धोरण हवे; शुल्काच्या गुंत्यात अडकवणारे नव्हे

# जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचाली

# बाळराजे पाटील यांच्या चेअरमनपदाची चर्चा

सोलापूर (कटूसत्य वृत्त) : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रमुख नेत्यांकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. महाराष्ट्र सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा मोहोळचे माजी आमदार ज्येष्ठ नेते राजन पाटील यांनी आमदार राजेंद्र राऊत यांची भेट घेऊन जिल्हा बँकेच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा केल्याने सहकार क्षेत्रासह जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची जिल्ह्याची परंपरा असल्याचे सांगत, सर्व प्रमुख नेत्यांनी एकत्रित चर्चा करून सामंजस्याचा मार्ग काढावा,



अशी भूमिका या बैठकीत मांडण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्याचे राजन पाटील यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर आमदार राजेंद्र राऊत आणि सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडूनही प्रमुख नेत्यांशी चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने विविध राजकीय गटांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे.

### बाळराजे पाटील यांच्या नावाची चर्चा

दरम्यान, राजन पाटील यांचे पुत्र तथा लोकनेते साखर कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील यांना सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमनपद मिळणार का, असा प्रश्न पत्रकारांनी राजन पाटील यांना विचारला. त्यावर त्यांनी "अजून कशातच काही नाही," असे स्पष्ट केले.

जिल्हा बँकेची निवडणूक आधी बिनविरोध करण्यावर भर असून, त्यानंतर सर्व नेते एकत्र बसून पुढील निर्णय घेतील, अशी भूमिका राजन पाटील यांनी मांडली. त्यामुळे बाळराजे पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू असली, तरी त्यांच्या चेअरमनपदाबाबत सध्या कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे.

"आपल्या जिल्ह्याची परंपरा निवडणूक बिनविरोध करण्याची आहे. आधी निवडणूक बिनविरोध करायची आणि त्यानंतर सर्वजण बसून पुढील निर्णय घ्यायचा. त्यामुळे बाळराजे पाटील यांच्या चेअरमनपदाबाबत निर्णय होण्यासाठी अजून बराच वेळ आहे," असे राजन पाटील यांनी सांगितले.

### २,१६५ ठराव दाखल; निवडणूक प्रक्रियेला वेग

दरम्यान, जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी तब्बल २,१६५ ठराव दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेला वेग आला असून, विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून निर्माण होणारी राजकीय समीकरणे महत्त्वाची ठरणार आहेत.

एकीकडे निवडणुकीची प्रशासकीय प्रक्रिया पुढे सरकत असताना दुसरीकडे प्रमुख राजकीय नेत्यांकडून निवडणूक बिनविरोध

(पान २ वर)

# विविध पक्ष, संघटनांकडून जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यात पावसाने दीर्घ ओढ दिल्यामुळे सर्वच तालुक्यांत पाणीटंचाई, चारा टंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हाता-तोंडाशी आलेली खरीप पिके जळून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

या पार्श्वभूमीवर केवळ ठराविक तालुके नव्हे, तर संपूर्ण सोलापूर जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, तसेच तातडीने उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी विविध पक्ष, संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून होत आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यात पाणी व चारा टंचाईचा प्रश्न गंभीर झाल्याने तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, असा ठराव पंचायत समितीच्या मासिक सभेत करण्यात आला. तसेच,



अक्कलकोट येथे अपुऱ्या पावसामुळे कोरडा दुष्काळ घोषित करावा, अशी मागणी रिपाइं (एकतावादी) रोजगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष विकी बाबा चौधरी यांनी कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांची भेट घेऊन केली.

अक्कलकोट तालुक्यासह जिल्ह्यात तीव्र दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, या मागणीचे निवेदन मनसेच्या वतीने तहसीलदारांना देण्यात आले आहे. येत्या आठ दिवसांत शासनाने दुष्काळ जाहीर न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

दक्षिण सोलापूर दुष्काळग्रस्त घोषित करून वीजबिल व शैक्षणिक शुल्क माफीसारख्या

(पान २ वर)

# जिल्ह्यात ३३२ शिक्षकांना जागेवर नियुक्ती आदेश देऊन सेवा संकल्प अभियानाची सुरुवात

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यात ३३२ शिक्षकांना जागेवर नियुक्ती आदेश देऊन सेवा संकल्प






अभियानाची सुरुवात करीत सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात आदर्श निर्माण केला आहे.

यशवंतराव चव्हाण सभागृहात आज सेवा संकल्प अभियानाचे आयोजन करणेत आले होते. या अभियानाचा शुभारंभ नूतन ३३२ शिक्षकांना जागेवर समुपदेशनाने नियुक्ती देऊन सुरुवात केली. सामान्य प्रशासन विभागाने आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पुर्ण झाले बद्दल सेवा संकल्प अभियानाचे आयोजन करणेत आले होते. शिक्षण विभागात प्रातिनिधिक स्वरूपात पंढरपूर तालुक्यातील सिध्देवाडी येथील पांडुरंग ज्ञानेश्वर शिंदे व आदिती चव्हाण या उमेदवारास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचे हस्ते नियुक्ती आदेश देऊन सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ करणेत आला. या साठी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, शिक्षण व आरोग्य समितीचं सभापती चेतनसिंह केदार, महिला व बाल कल्याण विभागाचे सभापती अमृता वाघे, कृषी व पशु संवर्धन विभागाचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ प्रमुख उपस्थित होते.

सामान्य प्रशासन विभागाने गटविकास अधिकारी यांची विशेष बैठक घेऊन सोलापूर जिल्ह्यात या सेवा संकल्प अभियानाचे विशेष नियोजन केले आहे.

(पान २ वर)

## पाहिजेत

पाहिजे

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / बातमीदार | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत. एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करू शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारावर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेऊनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरूमसमोर, होटगी रोड, सोलापूर-१४३००३.

मो. ९६५७०६९०६९, ९४०३४६३०७९

## संपादकीय

# UPI वरचा नवा भार : कर नाही म्हणत करच?

डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यवस्थेवरच आता शुल्काचा बोजा का? कधीकाळी देशाला 'कॅशलेस' करण्यासाठी मोठमोठ्या घोषणा झाल्या. नोटाबंदीपासून डिजिटल इंडियापर्यंत सरकारने नागरिकांना रोख व्यवहारांपासून डिजिटल व्यवहारांकडे वळवले. त्यात UPI हे भारतीय डिजिटल अर्थव्यवस्थेचे सर्वाधिक वापरले जाणारे माध्यम बनले. व्यवहार सोपा, तत्काळ आणि ग्राहकासाठी थेट शुल्कमुक्त हीच त्याची मोठी ताकद होती.

आता या व्यवस्थेवर शुल्काचा नवा अध्याय उघडण्याची चर्चा सुरू झाली आहे. सरकार याला 'टॅक्स' म्हणत नसेल, तरी व्यवहारावर आकारले जाणारे शुल्क, त्याची वसुली आणि त्याचा अंतिम आर्थिक भार ग्राहक किंवा व्यापाऱ्यावर जाण्याची शक्यता यामुळे सामान्य माणसाच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

समजा, एखाद्या वस्तूची किंमत १० हजार रुपये आहे आणि त्यावर १८ टक्के GST लागून बिल ११,८०० रुपये झाले. त्यानंतर डिजिटल पेमेंटच्या प्रक्रियेत MDR आकारला गेला आणि त्यावर पुन्हा GST लागला, तर प्रश्न साधा आहे. कर भरून झाल्यानंतर त्या कराच्या रकमेसह व्यवहार करण्यासाठी पुन्हा शुल्क आणि त्या शुल्कावर कर का?

सरकारकडून असे सांगितले जाऊ शकते की हा भार ग्राहकावर नसून व्यापाऱ्यावर असेल. पण अर्थशास्त्राचा प्राथमिक नियम असा आहे की कोणताही खर्च अखेरीस कोणाच्या ना कोणाच्या खिशातून जातो. व्यापारी कायमस्वरूपी स्वतःचा नफा कमी करून हा खर्च सहन करेल, याची हमी कोण देणार? तो ग्राहकाकडून किंमत वाढवून घेऊ शकतो, पेमेंटची पद्धत बदलू शकतो किंवा अन्य मार्गाने खर्च भरून काढू शकतो.

म्हणूनच 'ग्राहकावर कर नाही' एवढे सांगून प्रश्न संपत नाही. अंतिम आर्थिक भार कोण उचलणार? याचे स्पष्ट आणि पारदर्शक उत्तर सरकारने द्यायला हवे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ₹२,००० ची मर्यादा. व्यवहारांच्या संख्येच्या आधारावर 'बहुसंख्य व्यवहार ₹२,००० च्या खाली आहेत' असे सांगितले, तर ते एका अर्थाने बरोबर असू शकते. पण एकूण व्यवहारांच्या मूल्याच्या दृष्टीने चित्र वेगळे असू शकते. त्यामुळे सरकारने केवळ व्यवहारांची संख्या सांगण्याऐवजी ₹२,००० पेक्षा जास्त व्यवहारांचे एकूण मूल्य, त्यावर लागू होणारे शुल्क आणि त्याचा प्रत्यक्ष आर्थिक परिणाम सार्वजनिक करणे गरजेचे आहे.

UPI चालवण्यासाठी सर्व्हर, सायबर सुरक्षा, पायाभूत सुविधा आणि देखभाल यावर खर्च होतो, हे मान्य. पण मग प्रश्न पुढचा आहे. सरकारच्या प्रत्येक योजनेचा खर्च त्या योजनेतूनच स्वतंत्रपणे वसूल केला जातो का? आधारसाठी खर्च होतो. पॅनसाठी खर्च होतो. डिजिलॉकरसाठी खर्च होतो. जमीन अभिलेखांच्या डिजिटल व्यवस्थेसाठी खर्च होतो. पोलीस यंत्रणेसाठी खर्च होतो. न्यायव्यवस्थेसाठी खर्च होतो. मग प्रत्येक सेवेच्या वापरावर स्वतंत्र शुल्क लावायचे का? रस्ते बांधण्यासाठी कर घेतल्यानंतर त्याच रस्त्यावर टोल आकारण्याच्या पद्धतीबाबतही नागरिकांनी अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. मग डिजिटल पायाभूत सुविधांबाबतही तोच प्रश्न विचारला तर त्याला 'देशविरोधी' किंवा 'डिजिटल इंडियाविरोधी' ठरवण्याचे कारण काय? विशेषतः UPI ही केवळ पेमेंटची सुविधा राहिलेली नाही. ती भारतीय डिजिटल अर्थव्यवस्थेची पायाभूत रचना बनली आहे. छोट्या दुकानदारापासून भाजी विक्रेत्यापर्यंत आणि मोठ्या व्यापाऱ्यापासून ऑनलाइन व्यवसायापर्यंत कोट्यवधी लोक त्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे UPI वरील कोणताही अतिरिक्त खर्च हा केवळ बँकिंग क्षेत्राचा विषय नाही; तो महागाई, व्यापाऱ्यांचा खर्च, ग्राहकांची पेमेंटची सवय आणि डिजिटल व्यवहारांचा विस्तार यांच्याशी जोडलेला प्रश्न आहे.

आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे डिजिटल व्यवहारावर अतिरिक्त खर्च लावल्याने रोख व्यवहार पुन्हा वाढले तर? UPI मोफत ठेवण्यासाठी सरकारला अनुदान किंवा अन्य माध्यमातून खर्च करावा लागत असेल, तर तो खर्च किती आहे, त्याची रचना काय आहे आणि UPI वर शुल्क लावल्याने सरकारला प्रत्यक्ष किती फायदा होणार आहे, याचा संपूर्ण आर्थिक हिशेब जनतेसमोर यायला हवा.

कारण रोख चलन व्यवस्थेलाही नोटांची छपाई, वाहतूक, सुरक्षा, वितरण, ATM पायाभूत सुविधा आणि चलन व्यवस्थापन यासाठी मोठा खर्च होतो. त्यामुळे UPI वरील खर्च विरुद्ध रोख अर्थव्यवस्थेचा खर्च यांची तुलनात्मक आर्थिक गणना न करता केवळ 'UPI चालवायला खर्च येतो' हा युक्तिवाद अपुरा आहे.

यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या बदलाचा लाभ नेमका कोणाला होणार? भारताच्या UPI बाजारात Phonepe आणि Google Pay यांचा मोठा वाटा आहे. Phonepe च्या मालकीच्या रचनेत अमेरिकन कंपनी Walmart चा सहभाग आहे, तर Google Pay हे Google या अमेरिकन कंपनीचे उत्पादन आहे. त्यामुळे UPI वरील शुल्करचनेचा परिणाम पेमेंट कंपन्यांच्या महसूल आणि मूल्यांकनावर कसा होईल, याबाबतही पारदर्शक माहिती आवश्यक आहे. मात्र यावरून थेट 'अमेरिकेसमोर आत्मसमर्पण' असा निष्कर्ष काढण्यापूर्वी सरकारने आणि संबंधित संस्थांनी UPI शुल्करचनेमागील आर्थिक, नियामक आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित कारणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. आरोपांपेक्षा कागदपत्रे आणि आकडे बोलले पाहिजेत. आणि म्हणूनच सर्वात मोठा प्रश्न सरकारला UPI मोफत ठेवणे शक्य नाही, तर त्याचा संपूर्ण आर्थिक हिशेब जनतेसमोर ठेवा. ₹२,००० ची मर्यादा नेमकी कशासाठी? MDR चा अंतिम भार कोण उचलणार? MDR वर पुन्हा GST का? UPI वरील शुल्कामुळे सरकारला किती महसूल मिळणार? रोख व्यवहार वाढल्यास होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचे काय आणि या निर्णयाचा पेमेंट कंपन्या, व्यापारी आणि सामान्य ग्राहकांवर नेमका किती परिणाम होणार? हे प्रश्न विचारणे म्हणजे डिजिटल इंडियाला विरोध करणे नव्हे. उलट, डिजिटल भारताची व्यवस्था मजबूत आणि विश्वासार्ह ठेवायची असेल तर तिच्या प्रत्येक आर्थिक निर्णयाचा हिशेब जनतेला देणे हीच पारदर्शक लोकशाहीची अपेक्षा आहे. आज UPI मुळे एका छोट्या दुकानदाराला 'पैसे सुट्टे नाहीत' हा प्रश्न विचारावा लागत नाही. ग्राहकाला बँकेत रांग लावावी लागत नाही. काही सेकंदांत व्यवहार होतो. या व्यवस्थेला देशाच्या डिजिटल क्रांतीचे यश म्हटले जाते. मग त्या यशाची किंमत आता नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी का मोजायची? कर नाही म्हणत असाल तर आर्थिक भार कोणाचा, किती आणि का याचा हिशेब द्या. कारण नाव काहीही असोजनतेच्या खिशातून जाणारा पैसा हा पैसा असतो; त्याला 'कर नाही' म्हटल्याने त्याचे ओझे कमी होत नाही.

# गणेशोत्सवाचा सांस्कृतिक वारसा Bappa.org च्या माध्यमातून जागतिक पातळीवर जाणार

सोलापूर जिल्ह्यात यंदाच्या गणेशोत्सवाला अधिक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक आयाम प्राप्त होणार आहे. राज्य शासनाच्या वतीने गणेशोत्सवाच्या परंपरा, कला, संस्कृती, लोकजीवन, हस्तकला आणि वारसा* जागतिक पातळीवर पोहोचवण्यासाठी व्यापक जनजागृती आणि प्रचारमोहीम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाचा केंद्रबिंदू म्हणजे 'Bappa.org' या डिजिटल व्यासपीठाद्वारे गणेशोत्सवाचे दस्तऐवजीकरण करणे.




गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो समाजातील आध्यात्मिक, सामाजिक आणि उद्यमशीलता वाढवणारी लोकचळवळ आहे. या उत्सवामध्ये स्थानिक कारागीर, मूर्तिकार, कलाकार, हस्तकला करणारे कुशल कारागीर, सजावट करणारे तरुण-तरुणी, तसेच विविध प्रकारच्या पारंपरिक खाद्यपरंपरा आणि लोककलांचे मोठे योगदान दिसते. म्हणूनच महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला जागतिक स्तरावर मानांकन मिळवून देण्याच्या उद्देशाने वर्षभर सातत्याने उपक्रम राबवण्याच्या सूचना सांस्कृतिक कार्य विभागाने दिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी Bappa.org अभियानात सक्रिय सहभाग द्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. आपल्या मंडळाच्या मांडणीतील वैशिष्ट्ये, मूर्ती स्थापना व निर्मितीची पारंपरिक पद्धत, सजावटीची कलात्मक मांडणी, स्थानिक हस्तकला, लोकजीवनाशी निगडित ऐतिहासिक संदर्भ (असल्यास), तसेच खाद्यपरंपरा यांचे फोटो व माहिती संकलित करून Bappa.org वर नोंदविणे अपेक्षित आहे. तसेच त्या प्रक्रियेमागील स्थानिक कलाकार, लोककलावंत, मूर्तिकार, कारागीर यांची माहिती व त्यांच्या कला-कौशल्याचे दस्तऐवजीकरण करणेही आवश्यक आहे. यामुळे पुढील पिढ्यांसाठी ज्ञान जतन होईल, तर दुसरीकडे बाहेरच्या जगाला 'महाराष्ट्रातील गणेशोत्सवाची' खरी ओळख मिळेल.

त्याचप्रमाणे 'घरोघरी बाप्पा' उपक्रमातून नागरिकांनाही या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. घरगुती गणपती असो अथवा पारंपरिक पद्धतीने बसवलेला गणेशोत्सवआपल्या घरी बसवलेल्या गणपतीचे काही फोटो आणि थोडक्यात माहिती Bappa.org वर नोंदवा. नोंदणी करणाऱ्या नागरिकांना शासनाचे अधिकृत Digital Cultural Preserver Certificate दिले जाणार आहे. त्यामुळे सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण करण्यास नागरिकांचा अधिक उत्स्फूर्त सहभाग वाढेल.




या मोहिमेचा प्रचार प्रभावीपणे होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, गृहनिर्माण संस्था, RWAs, ग्रामपंचायती, बचत गट तसेच विविध WhatsApp समूहांवर लिंक व QR Code प्रसारित केले जाणार आहेत. प्रचार साहित्य, होर्डिंग्ज, पोस्टर्स, स्टँडीज, QR कोड अशा माध्यमांतून सर्वत्र संदेश पोहोचवला जाणार आहे. जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून स्थानिक वृत्तपत्रे, केबल नेटवर्क, रेडिओ आणि सोशल मीडियाच्या माध्यमातूनही सातत्याने प्रसिद्धी दिली जाणार आहे.

शेवटी, सोलापूर जिल्ह्याचा गणेशोत्सव हा आमच्या सांस्कृतिक विविधतेचे प्रतीक आहे. म्हणूनच सार्वजनिक मंडळे आणि नागरिकांनी आपल्या गणेशोत्सवाच्या कथाफोटो, कला, परंपरा व लोकपरंपराजगापर्यंत पोहोचवण्यासाठी Bappa.org वर नोंदणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

**संकलन- जिल्हा माहिती कार्यालय**

* पान १ वरुन *

*** जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध.....**

करण्यासाठी बैठका आणि चर्चांचे सत्र सुरू झाले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निवडणूक होण्यापूर्वीच राजकीय पातळीवर सहमतीचा फॉर्म्युला तयार करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे.

बिनविरोध की निवडणूक? उत्सुकता शिगेला

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याच्या सहकार आणि राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाची संस्था मानली जाते. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बिनविरोध निवडणुकीसाठी सर्व गटांमध्ये एकमत झाले, तर अनेक इच्छुकांना आपापल्या राजकीय समीकरणांनुसार तडजोड करावी लागू शकते.

दुसरीकडे, ठरावांची मोठी संख्या आणि विविध गटांची राजकीय ताकद पाहता जागावाटप, प्रतिनिधित्व आणि पदांच्या भविष्यातील समीकरणांवरून चर्चा रंगण्याची शक्यता आहे.

सध्या ''पहिले बिनविरोध निवडणूक, त्यानंतर चेअरमनपदाचा निर्णय'' अशी भूमिका पुढे येत असली, तरी अंतिम निर्णय कोणत्या राजकीय समीकरणातून होतो, याकडे सर्वांचे लक्ष आहे. त्यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक प्रत्यक्ष मतदानापर्यंत जाते की प्रमुख नेत्यांच्या चर्चेतून बिनविरोध मार्ग निघतो, तसेच बाळराजे पाटील यांच्या नावाभोवती सुरू झालेली चेअरमनपदाची चर्चा पुढे कोणते वळण घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

*** विविध पक्ष, संघटनांकडून जिल्हा.....**

सवलती लागू कराव्यात, अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक देवकते यांनी केली आहे. तसेच, भाजप ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनीही जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन पर्जन्यमान, पिकांची स्थिती आणि भूजल पातळीची पाहणी करून संपूर्ण जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे.

कुर्डू परिसरात पावसाअभावी निर्माण झालेल्या तीव्र पाणी व चारा संकटामुळे जनावरांसाठी तातडीने चारा डेपो, चारा छावण्या आणि पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत, असे निवेदन जिल्हा परिषद सदस्य आण्णासाहेब (संभाजी) ढाणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. तर करमाळा तालुक्यात पावसाने मोठी दडी मारल्यामुळे तापमानाचा पारा ३३ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला असून, वाढत्या उष्णतेमुळे नागरिक व शेतकरी हैराण झाले आहेत.

वेळकाढूपणा नको- जिल्ह्यातील दुष्काळाची वाढती बिकट परिस्थिती पाहता प्रशासनाने केवळ कागदोपत्री आकडेवारीचा आधार न घेता प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करावा. विशेषतः गेल्या आठवड्यात जिल्हाधिकारी आणि प्रशासनाच्या पथकाने जिल्ह्यात पाहणी केली आहे. त्यामुळे पुन्हा वेळकाढूपणा न करता तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी विविध संघटना व संस्थांकडून करण्यात येत आहे.

*** जिल्ह्यात ३३२ शिक्षकांना जागेवर.....**

सेवेचा संकल्प करून स्वच्छता मोहिमेत सहभागी व्हा - अध्यक्ष दिपक वैद्य- सोलापूर जिल्ह्यातील बीबीदीरफळ व मार्डी सारख्या ग्रामपंचायती दर रविवारी ग्रामस्थ एकत्र येऊन गावांत स्वच्छता करतात. लोकांना चांगल्या सेवा देणे बरोबर स्वच्छता ही सेवा हा उपक्रमांची व सेवा संकल्प अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करा.

सिईओ कुशल जैन यांनी जिल्ह्यात सेवा संकल्प अभियानाचे चांगले नियोजन केले आहे. या नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करणे साठी व सेवा देणे साठी संकल्प करा. सेवा संकल्प अभियान महिना भर चांगले राबवा. त्या पुढे देखील अभियान चांगले राबवा असे आवाहन केले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सेवा कार्याचा या निमित्ताने गौरव होत असल्याचे अध्यक्ष वैद्य यांनी सांगितले.

एक दिवस स्वच्छतेसाठी द्या - उपाध्यक्ष इंद्रजीत पवार- जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी संकल्प सेवा अभियाना बरोबर २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता महा श्रमदानात सहभागी होण्याचे आवाहन केलें. बिबिदारफळ मध्ये ४९ वा रविवार आहे. मार्डीने याची सुरुवात केली. अकोलेकाटी व बिबिदारफळ या कामात पुढाकार घेऊन श्रमदान करीत आहे. एक दिवस स्वच्छतेसाठी द्या असे आवाहन उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी केले.

ग्रामविकास विभाग अंतर्गत लोकांना चांगल्या सेवा द्या- सिईओ कुशल जैन- सेवा संकल्प अभियानांतर्गत मुख्य मंत्री समृद्धी पंचायतराज अभियानातील घटकांची चार सप्ताहात प्रभावी अंमलबजावणी करा. असे आवाहन सिईओ कुशल जैन यांनी केले.

ग्रामविकास व पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामविकास विभागाने दिलेले सुचना नुसार चार सप्ताहात विशेष सेवा द्या. सेवा संकल्प अभियानाच्या कालावधीत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणीस गती द्या. स्वच्छता ही सेवा २०२६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, प्लास्टिक निर्मूलन जलसंधारणाची कामे हाती घ्या असे आवाहन सिईओ जान यांनी केले. शिक्षण विभागातील ३३२ शिक्षकांचे समुपदेशन घेऊन नियुक्ती देऊन सेवा संकल्प अभियानाची सुरुवात केला आहे ही अभिमानास्पद बाब असल्याचे सिईओ जान यांनी सांगितले.

सेवा संकल्प अभियानात शिक्षण विभागाची सुरुवात - सभापती चेतनसिंह केदार-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सेवा कार्याचा सन्मान म्हणून जिल्हा परिषद प्रशासनाने राज्यात चांगली सुरुवात केली आहे. पंतप्रधान मोदी यांचे संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पुर्ण झाली. माझा विभागाने केलेली सुरुवात मनाला समाधान देणारी आहे. मार्डी व बिबीदारफळ सारख्या गावांचा स्वच्छतेचा आदर्श जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतींनी घ्यावा असे आवाहन केले.

प्रास्तविक उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी केले. ग्रामविकास विभागाने दिलेले मार्गदर्शना प्रमाणे जिल्ह्यात सेवा संकल्प अभियानात केलेल्या नियोजनाची माहिती दिली. शिक्षण विभागाच्या माध्यमातून ३३२ शिक्षकांना जागेवर नियुक्ती आदेश वितरण करण्याचे काम सुरू आहे. शिक्षणाधिकारी विशाल मुळे व त्यांचे टीमने समुपदेशन घेऊन पारदर्शी पध्दतीने ही नियुक्ती देणेत येत असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. प्रारंभी समाज कल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी समाजकल्याण विभाग व महिला व बाल कलियाण विभागाचे नियोजन सांगितले. तसेच माध्यमिक शिक्षणाधिरी सचिन जगताप, जिल्हा कृषी अधिकारी हरिदास हावळे, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपुरवाड, यांनी आपापल्या विभागाचे संकल्प सेवा अभियानातील उपक्रमाचे नियोजन सांगितले. सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले.उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकंत भुजबळ यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी एकाग्रता व निर्णय क्षमता विकसित करण्यासाठी बुद्धिबळ खेळास प्राधान्य द्यावे-अविनाश पवार

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- बुद्धिबळ खेळामधून विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, एकाग्रता, स्मरणशक्ती, तर्कशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित होते. त्यामुळे खेळाडूमध्ये संयम, दूरदृष्टी, नियोजन आणि समस्यांचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण होते. म्हणून विद्यार्थ्यांनी बुद्धिबळ खेळास प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या कै.पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात तालुका क्रीडा समितीने आयोजित केलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, उद्योजक विलास कोरे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, बुद्धिबळ हा आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जाणारा खेळ आहे, बुद्धिबळ खेळ 'विचार करून निर्णय घेणे, परिणामांचा अंदाज घेणे आणि अडचणींवर शांतपणे उपाय शोधणे' शिकवतो. म्हणूनच बुद्धिबळ हा केवळ एक खेळ नसून बौद्धिक विकास आणि व्यक्तिमत्त्व घडविण्याचे प्रभावी साधन आहे.



प्रारंभी शारीरिक शिक्षक क्रीडा महासंघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल कल्याणशेट्टी प्रशालेतील क्रीडा शिक्षक कुमार जाधव यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबुराव पवार यांनी केले. सूत्रसंचलन नागराज कलबुर्गी यांनी केले तर आभार दत्तात्रय हिळळी यांनी मानले. यशस्वीतेसाठी अविनाश राठोड, सोनल जाजू, सर्जेराव माशाळे, रवींद्र इंगळे, ज्योती नवले, दत्तात्रय धानोरे यांनी प्रयत्न केले.

बुद्धिबळामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास- बुद्धिबळ हा जगातील सर्वात लोकप्रिय खेळ असून त्यामुळे विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, तर्कशक्ती, एकाग्रता विकसित होते. त्यांचा सर्वांगीण विकास होतो म्हणून तालुका क्रीडा समितीने बुद्धिबळास प्राधान्य दिले आहे असे मत समितीचे प्रमुख बाबुराव पवार यांनी व्यक्त केले.

बुद्धिबळ स्पर्धेमध्ये ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग- अक्कलकोट तालुका क्रीडा समितीने आयोजित केलेल्या पावसाळी बुद्धिबळ स्पर्धेमध्ये तीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# १९,२०,२६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष शिबिराचे आयोजन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती सादर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या अनुषंगाने २४९-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांची, विशेषतः नवमतदार, महिला व दिव्यांग नागरिकांची शंभर टक्के नोंदणी पूर्ण व्हावी, यासाठी प्रशासनामार्फत विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी दिली. या मोहिमेअंतर्गत २४९-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर दि. १९, २०, २६ व २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांदरम्यान सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी आपापल्या मतदान केंद्रांवर वेळेत उपस्थित राहून नागरिकांकडून मतदार नोंदणी, माहितीतील दुरुस्ती तसेच नावे वगळण्याबाबतचे अर्ज भरून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नव्याने मतदार नोंदणी करण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांना नमुना क्र. ६ मध्ये अर्ज करता येईल. मतदार यादीतील चुकीची नोंद तसेच मयत अथवा स्थलांतरित मतदाराचे नाव वगळण्यासाठी नमुना क्र. ७ मध्ये अर्ज करता येईल. तसेच मतदार यादीतील नाव, वय, लिंग, नातेसंबंध, पत्ता आदी तपशीलांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी नमुना क्र. ८ मध्ये अर्ज करता येईल.या विशेष शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसोबत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनीही उपस्थित राहावे, अशा सूचना संबंधित राजकीय पक्षांना देण्यात येणार आहेत. शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून नागरिकांचे मतदार नोंदणी, दुरुस्ती अथवा नाव वगळणीचे अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. विशेष शिबिरांची माहिती सर्व प्रसारमाध्यमांद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात यावी तसेच या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार करण्यात यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष शिबिरांमध्ये महिला व दिव्यांग नागरिकांच्या समावेशना साठी विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीत आपले नाव नोंदवावे. पात्र मतदार मतदार यादीत नाव नोंदविण्यापासून वंचित राहू नयेत, तसेच विद्यमान मतदारांच्या नोंदी अद्ययावत व्हाव्यात, यासाठी २४९-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी या विशेष शिबिरांमध्ये सहभागी होऊन मतदार यादीतील आपल्या नोंदी अद्ययावत कराव्यात, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी केले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# मोहोळच्या आरोग्य व्यवस्थेवर सीमा पाटील यांचा प्रहार



मोहोळ (कटूसत्य वृत्त)- मोहोळ शहरातील आरोग्य व्यवस्थेतील विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत आरोग्य समिती सदस्या तथा माजी नगरसेविका सीमा पाटील यांनी प्रशासनाला धारेवर धरले. शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, प्रभागनिहाय आरोग्य सुविधा, दूषित पाण्याचा प्रश्न, संसर्गजन्य आजारांचे सर्वेक्षण, हॉटेल-ढाब्यांवरील कामगारांची आरोग्य तपासणी, प्लास्टिक कॅरीबॅगविरोधातील कारवाई आणि महिलांच्या कॅन्सर तपासणी शिबिरांसह विविध मागण्या त्यांनी जन आरोग्य समितीच्या बैठकीत मांडल्या. पंचायत समिती, मोहोळ येथील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रात जन आरोग्य समितीची (ग-ड) बैठक पार पडली. यावेळी सीमा पाटील यांनी शहरातील आरोग्यविषयक प्रश्नांची वस्तुस्थिती प्रशासनासमोर मांडत नागरिकांच्या आरोग्याबाबत अधिक गांभीर्याने काम करण्याची मागणी केली. शहरातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यासाठी विशेष शिबिरे घेण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच नागरिकांना आयुष्मान भारत, आभा कार्ड व रेशन कार्ड ऑनलाइन करण्यासाठी प्रभागनिहाय शिबिरे घेऊन जनजागृती करण्याची मागणी करण्यात आली. प्रभाग क्रमांक १ हा वाड्या-वस्तीचा भाग असल्याने येथील नागरिकांना तातडीच्या उपचारांसाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगत या भागात नवीन आरोग्य वर्धिनी दवाखाना तातडीने सुरू करावा, अशी मागणी पाटील यांनी केली. त्याचबरोबर आरोग्य विभागाने घरोघरी जाऊन बीपी, शुगर तसेच इतर असंसर्गजन्य आजारांचे सर्वेक्षण करून आवश्यक उपचार उपलब्ध करून द्यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दूषित पाण्यावर प्रशासनाला सवाल मोहोळ शहरातील पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेचा मुद्दाही बैठकीत ऐरणीवर आला. पाणी साठे, जारचे पाणी, हातपंपाचे पाणी तसेच नगरपरिषदेच्या गटारमिश्रित नळाद्वारे येणाऱ्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासावेत, अशी मागणी सीमा पाटील यांनी केली. दूषित पाणी आणि अन्नामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्यास दोषींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये केलेल्या कारवाईचे त्यांनी अभिनंदन केले. त्याच धर्तीवर मोहोळमध्येही आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक बाबींवर कठोर कारवाई व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. ढाब्यांवरील कामगारांच्या तपासणीची मागणी

शहर व महामार्गावरील हॉटेल तसेच ढाब्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. काही ढाब्यांवरील कामगारांना टीबीसारखे संसर्गजन्य आजार असल्याची माहिती समोर आल्याचा दावा करण्यात आला असून, याची अधिकृत आरोग्य तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पाटील यांनी केली. तसेच आरोग्यास घातक ठरणाऱ्या प्लास्टिक कॅरीबॅगचा साठा नष्ट करून संबंधितांवर कडक कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले. प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या आशा वर्कर्सचे मानधन वेळेवर अदा करावे आणि महिलांसाठी विशेष कॅन्सर तपासणी शिबिरांचे आयोजन करावे, या मागण्याही बैठकीत मांडण्यात आल्या. या सर्व मागण्यांवर आरोग्य अधिकारी डॉ. अरुण पाथरुडकर यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. बैठकीस डॉ. दिलीप कादे, डॉ. अर्चना देठे, मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके, नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे, नगरसेवक बंडू देशमुख, राणी गोडसे, सागर अस्तुल, लखन कोळी, रजनीकांत सुतार यांच्यासह आरोग्य विभागाचे कर्मचारी व आशा वर्कर्स उपस्थित होते.

# राऊत-राजन पाटील भेट; सोलापूर डीसीसी बँक निवडणुकीवर चर्चा

बार्शी (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार ज्येष्ठ नेते राजन (मालक) पाटील यांनी आज आमदार राजेंद्र राऊत यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार राऊत यांनी राजन पाटील यांचा सत्कार करून स्वागत केले.



या भेटीदरम्यान सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी) आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा झाल्याची माहिती आमदार राजेंद्र राऊत यांनी दिली. शेतकऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांशी थेट जोडलेल्या सोलापूर डीसीसी बँकेच्या निवडणुकीला सहकार क्षेत्रात विशेष महत्त्व आहे. त्यामुळे राऊत आणि राजन पाटील यांच्या भेटीतील चर्चेकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात राजन पाटील यांचा दीर्घकाळ प्रभाव राहिला आहे. तर बार्शी मतदारसंघाचे आमदार म्हणून राजेंद्र राऊत हेही सहकार व शेतकरी प्रश्नांवर सक्रिय भूमिका मांडत असतात. या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांमध्ये झालेली डीसीसी बँक निवडणुकीवरील चर्चा राजकीय आणि सहकार क्षेत्रात चर्चेचा विषय ठरत आहे. दरम्यान, या भेटीमुळे डीसीसी बँकेच्या निवडणुकीत आगामी काळात कोणती राजकीय समीकरणे आकाराला येतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

# सिंहगडच्या 'कोड-ए-थॉन २०२६' ला ६०० विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ईश्वर फाउंडेशन आणि एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कोड-ए-थॉन २०२६'च्या चौथ्या पर्वाला राज्यभरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ११ व १२ सप्टेंबर रोजी झालेल्या या दोन दिवसीय कोडिंग स्पर्धेत विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत WITच्या संगणक अभियांत्रिकी (CSE) शाखेचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी प्रशांत भूषण पांचाळ याने प्रथम क्रमांक पटकावला. VPKBIET, बारामतीच्या CSE शाखेचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी साळुंके सुदर्शन नानासाहेब याने द्वितीय, तर PICT, पुणेच्या माहिती तंत्रज्ञान (IT) शाखेचा द्वितीय वर्षाचा विद्यार्थी चांदसाब मशाक उजलुमवाले याने तृतीय क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांच्या प्रोग्रामिंग ज्ञानाबरोबरच तार्किक विचारक्षमता, समस्या सोडविण्याचे कौशल्य आणि प्रत्यक्ष कोडिंग क्षमतेची चाचणी घेण्यासाठी स्पर्धेची रचना तीन फेऱ्यांमध्ये करण्यात आली होती. पहिल्या फेरीत Programming Concepts, दुसऱ्या फेरीत aptitude, Data Structures and algorithms, तर तिसऱ्या आणि अंतिम फेरीत Online Coding Round घेण्यात आला. प्रत्येक फेरीतील कामगिरीच्या आधारे विद्यार्थ्यांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली. अंतिम फेरीत स्पर्धकांना निर्धारित वेळेत विविध प्रोग्रामिंग समस्या सोडविण्याचे आव्हान देण्यात आले. यामध्ये कोडची अचूकता, समस्या सोडविण्याची पद्धत आणि अल्गोरिदमच्या प्रभावी वापरावर विद्यार्थ्यांची कसोटी लागली. विजेत्यांना लॅपटॉप आणि गिफ्ट व्हाउचर देऊन गौरविण्यात आले, तर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ही स्पर्धा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडली. स्पर्धेच्या आयोजनात प्रा. सूरज अनिल धनवे यांनी महाविद्यालयीन समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. ईश्वर फाउंडेशन आणि महाविद्यालय यांच्यातील समन्वयासह स्पर्धेच्या विविध फेऱ्यांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी ईश्वर फाउंडेशनचे समन्वयक सतीश कुरपाटी, अवधूत सोमराज, महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सूरज धनवे, विजेते तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबतच प्रत्यक्ष कोडिंग, डेटा स्ट्रक्चर, अल्गोरिदम आणि समस्या सोडविण्याच्या कौशल्यावर भर देणे आवश्यक आहे. 'कोड-ए-थॉन'सारख्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपले तांत्रिक कौशल्य तपासण्याबरोबरच स्पर्धात्मक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळते, असे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सांगितले.

# १५ व्या वित्त आयोगाच्या निधी वाटपाची चौकशी करा! आ. राजू खरे यांनी घेतली भेट



मोहोळ (कटूसत्य वृत्त)- मोहोळ पंचायत समिती कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी पंचायत समिती सदस्यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणस्थळी आमदार राजू खरे यांनी भेट देत आंदोलनकर्त्यांशी सविस्तर संवाद साधण्यात आला.

१५ व्या वित्त आयोगाच्या निधी वाटपाची सखोल व जलदगतीने चौकशी करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत मंजूर निधीच्या वाटपाला स्थगिती द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्ते गटनेते व पंचायत समिती सदस्य बाळासाहेब गायकवाड यांनी केली.

उपोषणकर्त्यांनी निधी वाटपाच्या प्रक्रियेबाबत उपस्थित केलेले आक्षेप व त्यांच्या मागण्या आमदार राजू खरे यांनी जाणून घेतल्यानंतर या विषयासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करण्यात आली. आंदोलनकर्त्यांच्या भावना आणि त्यांच्या मागण्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.

१५ व्या वित्त आयोगाचा निधी हा गावांच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी उपलब्ध होणारा सार्वजनिक निधी आहे. त्यामुळे त्याच्या वाटपात नियमांचे पालन होऊन सर्व संबंधित गावांना न्याय्य व पारदर्शक पद्धतीने निधी मिळणे आवश्यक आहे, अशी स्पष्ट भूमिका यावेळी आमदार राजू खरे यांनी मांडली.

निधी वाटपाच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप किंवा भेदभाव होता कामा नये. विकासाचा निधी हा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा गटाच्या मर्जीचा विषय नसून तो जनतेच्या हक्काचा आहे. त्यामुळे निधी वाटप पारदर्शक, नियमबद्ध आणि लोकहिताच्या निकषांवरच झाले पाहिजे, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केलेल्या आरोपांची सक्षम यंत्रणेमार्फत वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी. चौकशीत अनियमितता किंवा दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. मोहोळ तालुक्याच्या विकासासाठी मिळणाऱ्या निधीच्या प्रत्येक रुपयाचा विनियोग जनतेच्या हितासाठी झाला पाहिजे. निधी वाटपात कोणताही भेदभाव सहन केला जाणार नाही, अशी भूमिका यावेळी स्पष्ट करण्यात आली. या प्रश्नावर पुढील काळातही सातत्याने पाठपुरावा करण्याचे आश्वासनही आमदार राजू खरे यांनी दिले.

मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत उपोषण हे आंदोलन चालूच राहणार असल्याचा इशारा उपोषणकर्ते पंचायत समिती सदस्य डॉ. अमित व्यवहारे, पंचायत समिती सदस्य गणेश मुळे, पंचायत समिती सदस्य संगीत वसेकर यांनी दिला. यावेळी संजय अण्णा क्षीरसागर, सौदागर साठे, दीपक गवळी, सुनील पाटील, विनोद कांबळे, पद्माकर अप्पा देशमुख, सतीश पाटील, राहुल व्यवहारे, नवनाथ आवारे, चंद्रकांत निकम, राजू गूंड, दमणी अण्णा गोडसे, डॉ. झेंडगे, बंडू मामा मुळे, देविदास चव्हाण आदी आंदोलनकर्ते उपस्थित होते.

# वृक्षारोपणातून 'सेवा संकल्प अभियाना'चा शुभारंभ 'सेवाज्योत' बाइक रॅलीने दिला लोकसेवेचा संदेश



सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे वृक्षारोपण करून 'सेवा संकल्प अभियानाचा' उत्साहात शुभारंभ करण्यात आला.

जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समिती सभापती इंद्रजित पवार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या हस्ते वृक्षारोपण करून अभियानाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी शिक्षण व आरोग्य समिती सभापती केदार सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्यासह पंचायत समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना व लोककल्याणकारी उपक्रमांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे, लोकसहभाग वाढविणे, ग्रामस्तरावर लोकाभिमुख उपक्रम राबविणे आणि विकासकामांना गती देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यानंतर पंचायत समिती उत्तर सोलापूर येथून 'सेवाज्योत' बाइक रॅलीला उत्साहात सुरुवात करण्यात आली. रॅलीने विविध मार्गाने मार्गक्रमण करत डफरीन चौक गाठला. त्यानंतर रॅलीची सांगता छत्रपती शिवाजी महाराज उद्यान रंगभवन येथे करण्यात आली.

रॅलीच्या सांगतेनंतर उपस्थित मान्यवर व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश आणि 'सेवाज्योत' बाइक रॅलीतून लोकसेवेचा संकल्प या उपक्रमातून 'सेवा संकल्प अभियानाची' दमदार सुरुवात झाली.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न



अकलूज (कटूसत्य वृत्त):- शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज येथे सृजनरंग महोत्सव अंतर्गत सहकार महर्षी करंडक शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा अत्यंत उत्साही व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व गुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील विचार क्षमतेला चालना देण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या स्पर्धेत शालेय व महाविद्यालयीन अशा विविध गटांतून एकूण ६२ स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे: गट क्रमांक १ (इयत्ता ५ वी ते ७ वी): प्रथम: रोशनी हाके द्वितीय: सृष्टी मगर तृतीय: मेहरून मुलाणी चतुर्थ: इरिना पठाण गट क्रमांक २ (इयत्ता ८ वी ते १० वी): प्रथम: पूर्वा चव्हाण द्वितीय: भूमिका मगर तृतीय: संस्कृती दुपडे चतुर्थ: राजनंदिनी गायकवाड

गट क्रमांक ३ (इयत्ता ११ वी व महाविद्यालयीन गट): प्रथम: प्रेरणा गायकवाड द्वितीय: संजीवनी शेंडगे तृतीय: वैभवी नलावडे चतुर्थ: संस्कार रणनवरे स्पर्धेतील सर्व विजेत्यांना रोख रक्कम व आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या स्पर्धेचे परीक्षण प्रा. सुनिता ठोंबरे, प्रा. भारत साठे, प्रा. रविंद्र माने-देशमुख, प्रा. नागन्नाथ साळवे, प्रा. सनी वर्दम व प्रा. श्रेया देशमुख यांनी केले. स्पर्धेचा निकाल वाचन सृजनरंग समन्वयक डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर, सीडीसी सदस्य डॉ. हणमंत आवताडे व सर्व मान्यवर परीक्षकांच्या शुभहस्ते पार पडला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख व शिक्षक सहकाऱ्यांनी व शिक्षकेतर बंधू यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिला सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा २४ तास सतर्क- प्रेरणा कट्टे




पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- महिला, युवती आणि मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पोलीस प्रशासनाने सुरक्षा यंत्रणा अधिक बळकट केली आहे. कोणत्याही आपत्कालीन किंवा संकटाच्या प्रसंगी महिलांना तात्काळ मदत मिळावी, यासाठी '११२' हा एकत्रित आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक २४ तास कार्यरत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने महिलांनी कोणतीही भीती न बाळगता या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले.

शासकीय योजनांची जनजागृती करण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने गणेश मंडळांच्या माध्यमातून 'लोकसंवाद-२०२६' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील श्रीकृष्ण गणेश तरुण मंडळ येथे आयोजित कार्यक्रमात अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी महिला सुरक्षेसाठी शासन व पोलीस प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

महिलांवरील छेडछाड, अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही धोकादायक परिस्थितीत '११२' क्रमांकावर संपर्क साधल्यास पोलीस नियंत्रण कक्षामार्फत तातडीने मदतकार्य सुरू केले जाते. जीपीएस प्रणालीच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीचे लोकेशन निश्चित करून आवश्यकतेनुसार पोलीस गस्ती पथक किंवा स्थानिक पोलीस घटनास्थळी मदतीसाठी पोहोचतात. महिला सुरक्षेसाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या असून, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महिला सहाय्यता कक्ष, महिला सुरक्षा समिती, विशेष समुपदेशन केंद्र, हेल्पलाइन, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ तसेच तक्रार निवारण समिती आदी यंत्रणांचा त्यामध्ये समावेश आहे. संकटाच्या प्रसंगी महिलांनी स्वतःचे संरक्षण कसे करावे तसेच पोलीस प्रशासनाची मदत कशी घ्यावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

गणेश मंडळांनी गणेश विसर्जनाच्या वेळी पारंपरिक वाद्यांचाच वापर करावा. डॉल्बी व लेझर सिस्टीमवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी मंडळांनी गावाच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवावी, गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चास मदत करावी, वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहनही अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले. प्रारंभी पंढरपूर उप माहिती कार्यालयाचे अविनाश गरगडे यांनी लोकसंवाद २०२६ उपक्रमाची माहिती व उद्देश सांगितला. या कार्यक्रमास कासेगाव ग्रामस्थ विशेषत: महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# पंढरपूर पंचायत समितीत 'सेवा संकल्प अभियान'चा शुभारंभ



पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):- शासकीय सेवा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्यासोबतच, गावांच्या स्थानिक गरजा ओळखून विकासाला लोकसहभागाची जोड देण्यासाठी पंचायत समिती पंढरपूर येथे 'सेवा संकल्प अभियान' चा शुभारंभ करण्यात आला. पंचायत समितीच्या शेतकी भवन सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती शुभम आगावणे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार प्रशांत परिचारक उपस्थित होते. दिनांक १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या एक महिन्याच्या कालावधीत पंढरपूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर हे अभियान व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. या अभियानाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ योजनांची माहिती दिली जाणार नसून, नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे आणि त्यांच्या प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करणे यावर प्रशासनाचा मुख्य भर असणार आहे.''प्रशासन आणि नागरिक यांनी योग्य समन्वय ठेवून विविध शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत कसा पोहोचवता येईल, यासाठी या अभियानाचा प्रभावी वापर करावा असे यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले. तर अध्यक्षीय भाषणात सभापती शुभम आगावणे यांनी या अभियानाचे महत्त्व विशद करत सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गट विकास अधिकारी अमोल जाधव यांनी अभियानाची सविस्तर रूपरेषा आणि नियोजित उपक्रमांची माहिती दिली. या कार्यक्रमाला उपसभापती प्रमोद देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य यांच्यासह तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, नागरिक आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन सोनकांबळे (स.प्र.अ.), शहाजहान तांबोळी (क.प्र.अ.), महेश वैद्य (वरिष्ठ सहाय्यक) आणि प्रताप बोंगाळे (तालुका समन्वयक) यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एनसीएमसी कार्डधारकांसाठी भीम ॲपद्वारे टॉप अप करता येणार

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांसाठी डिजिटल सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे.

एनसीएमसी कार्डधारकांना आता भीम ॲपच्या माध्यमातून आपल्या कार्डचे टॉप अप करता येणार आहे.

त्यामुळे कार्डमध्ये शिल्लक रक्कम संपल्यानंतर पुन्हा रिचार्ज करण्यासाठी केंद्रावर जाण्याची आवश्यकता राहणार नसून, मोबाईलच्या माध्यमातून घर बसल्या कार्डमध्ये रक्कम जमा करता येणार आहे.

एनसीएमसी कार्ड प्रकल्पांतर्गत अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांच्या एनसीएमसी कार्डची नोंदणी व वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.